# श्री. पांडुरंग पवार ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित,

## दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय

## निमगाव सावा, तालुका- जुन्नर, जिल्हा- पुणे.

## इतिहास विभाग

## इतिहास विभाग प्रमुख: प्रा.गायकवाड.एन.ए.

## प्रथम वर्ष कला (२०२३-२४)

## सत्र पहिले

## इतिहास (G1) (१११७१)

# प्रारंभिक भारत: प्रागैतिहासिक काळ ते मौर्य काळ

## सूचना:

येथे देण्यात आलेल्या नोट्स या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी देण्यात आल्या आहेत. हे स्वतंत्र संशोधन नाही. विविध संदर्भ ग्रंथांच्या आधारे येथे मांडणी करण्यात आली आहे. त्यापैकी निवडक संदर्भ साहित्य खालील प्रमाणे:

१) प्रारंभिक भारत: प्रागैतिहासिक काळ ते मौर्य काळ: प्रा.ज्योती गणेश राऊत.

२) प्रारंभिक भारत: प्रागैतिहासिक काळ ते राष्ट्रकुट काळ: डॉ.जी.बी. शहा, डॉ.एस.डी.खैरनार, प्रा.नारायण शिंदे.

३) प्राचीन भारत: प्रा.श्रीहरी रामचंद्र थोरवत, डॉ.लहू कचरू गायकवाड, प्रा.किशोर जनार्दन लांडेपाटील.

४) प्रारंभिक भारत: प्रागैतिहासिक काळ ते मौर्य काळ: प्रा.कल्याण चव्हाण.

# प्रकरण पहिले

## प्रारंभिक भारत: साधने आणि प्रागैतिहासिक काळ .

अ) प्रारंभिक इतिहासाचे महत्त्व.

ब) इतिहासाची साधने: पुरातत्त्वीय (भौतिक अवशेष), आलेख (शिलालेख, गुफालेख, नाणकशास्त्र (नाणी), साहित्यिक साधने, परकीय प्रवासवर्णने

क) पुरापाषण युग, मध्यापाषण युग, नवाश्म युग आणि ताम्रपाषाणयुगीन संस्कृती: संक्षिप्त आढावा.

# अ) प्रारंभिक इतिहासाचे महत्त्व

## प्रास्ताविक:

प्राचीन भारताच्या इतिहासाचा कालखंड साधारण इ.स.पु १ लाख ते इ.स. १२ वे शतक आहे. म्हणजे मानव जन्म से मानवी संस्कृतीचा विकास अगदी १२ व्या शतकापर्यंत अभ्यासने म्हणजे प्राचीन भारताचा अभ्यास करणे होय. त्याकाळात मानवाने प्रत्येक टप्यागव्ये नैसर्गिक घटकांवर मात करून एक एक नवीन शोध लावला. चाकाचा शोध हा मानवाच्या गतीचे प्रतिक मानले जाते. त्यानंतर अग्नीचा शोध व धातुचा शोध मानवाच्या विकासाला दुवा ठरले. मानवी जीवनशैलीतील उत्तरोत्तर होत जाणारा बदल व मानवी प्रगतीचं आकलन करण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी आपल्याला पारंभिक इतिहासाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.. मानवाच्या रानटी जीवनाकडून मानवाचे आत्ताचे गांस्कृतिक सामाजिक राजकीय आर्थिक धार्मिक जीवनाचे परिवर्तन हा मानवी विकासाचा मोठा टप्पा मानवाची प्रगती दर्शवतो.

## १) मानवी उत्कांतीचा अभ्यास

प्रारंभिक इतिहासाचा आढावा घेत असताना त्यामध्ये समाविष्ट होणारा मानवी उत्कांती ही अधिक महत्त्वाची ठरते. मानवाची उत्कांती ही खुप गुंतागुतीची प्रकिया आहे मानवाचे अनेक पूर्वज त्यात समाविष्ट होतात. मानव हा पाणी जगण्याच्या प्रत्येक टप्यावर आपला विकास करताकरता नैसर्गिक घटकांवर मात करत होता तशी त्याची सारिरीक रचना देखील बदलत गेली. ही मानवी उत्क्रांती समजुन घेण्यासाठी पारंभिक इतिहासाचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

## २) अस्थिरतेकडुन स्थिरतेकडे

प्रथम अवस्थेत मानव हा भटके व अस्थिर आयुष्य जगत होता. एकाकी आयुष्य जगणारा मानव आता गटागटाने राहू लागला व नैसर्गिक आपत्ती पासून म्हणजे ऊन वारा पाऊस थंडीपासून संरक्षण करण्यासाठी गुहांचा आसरा घेऊ लागला. या गुहांमध्ये तो आपल्या आकलनानुसार मितीवर चित्र रेखाटत असे मिनेटका हे त्याचे उदाहरण आहे. पाण्याची आता लक्षात घेता मानवान वस्तीसाठी नदवांची खोरी जवळ केली. मानवाला प्रतीचा शोध लागला व मानवावे मटके जीवन स्थिर झाले. मानवाच्या सामाजिक राजकीय आर्थिक धार्मिक जीवनाची सुरुवात झाली व त्यातूनच त्या काळातील मोठमोठी राज्य उदयाला आली.

## ३) समाजनिर्मीतीची कथा

निर्सगातील हिंस्त्र पाण्यांपासून संरक्षण किंवा मोठ्या प्राण्यांची शिकार करण्यासाठी मानव गटागटाने राहु लागलाय मानवाच्या सामाजिक जीवनाला सुरुवात झाली. मानव कुटुंब व्यवस्थेत राहू लागला. मानवाची प्रारंभिक व सुरुवातीची अस्थिर अवस्था ते मानवाची कौटुंबिक अवस्था हा मानवाच्या दृष्टीने खूप मोठा परिवर्तनशील काळ आहे.

## ४) धातूचे महत्त्व

मानवाच्या जीवनाला धातू शोधगुळे वेगळी कलाटणी मिळाली. मानवास शोध लागलेला पहिला धातू हातांव आहे त्यामुळे त्या ठराविक संस्कृतीला ताम्रपाषाण संस्कृती म्हणतात. वैदिक संस्कृतीमध्ये तांब्याला धार्मिक महत्त्व आहे. मानवाच्या वापरात दगडाप्रमाणे धातूची हत्यारे देखील येऊ लागली. लोह युगाता मानवाला लोखंडाचा शोध लागला ज्यामुळे शेतीतील अवजार व जंगल साफ करण्यासाठी मानवाला गोप व सोईस्कर झाले. लोखंडी नांगरामुळे शेती अधिक खोलवर केली जाऊ लागली व शेतीच्या उत्पादनात वाढ झाली. धातूच्या शोधामुळे मानवी जीवनात कसे बदल झाले हे या अभ्यासातून आपणास समजते.

## ५) मानवाची प्रगती


वर्तमानातील मानव हा प्रगतीच्या अति उत्तुंग शिखरावर पोहचला आहे. परंतु त्याची अगदी प्रारंभिक काळापासुन झाली आहे. मानवाला चाकाचा शोध लागला व मानवाला एका ठिकाणावरून दुस-या ठिकाणी स्थलांतर करणे अधिक सोपे झाले. हत्यारांना तिक्षणता देत असताना दगडावर दगड घागुन त्यातुन थीनगी उडत असे हयातून मानवाला अग्निचा शोध लागला ज्या पासून मानवाचे थंडीतुन संरक्षण होत असे. नदयांच्या खो-यात राहणा-या मानवाला आपण खालेल्या फळांच्या बिया जर मातीत पुरल्या तर त्या पागुन त्याच फळाचे नविन रोप तयार होते हे माहित झाले हयातूनच मानवाला शेतीचा शोध लागला व मानवाच्या सामजिक राजकिय जीवनाला सुरुवात झाली.

# ब) इतिहासाची साधने

**प्रास्ताविक :**

इतिहास लिहिताना अभ्यासताना आपणास विशेष काळजी घ्यावी लागते. ऐतिहासिक घटनांचा खरा इतिहास लिहिण्यासाठी किंवा अभ्यासण्यासाठी पुरावे लागतात. इतिहास लखनासाठी उपयोगी पुराव्यांना इतिहासाची साधन म्हणतात. साधने नसतील तर विश्वसनीय इतिहास लिहिता येत नाही. त्यामुळे इतिहासाच्या साधनांना मोठे महत्त्व असते.

इतिहास लिहिण्यासाठी साधने शोधून गोळा करून ती तपासावी लागतात. तपासाअंती ती साधने खरी ठरल्यास त्यांचा लेखनासाठी वापर करता येतो. अशी साधने विविध प्रकारची असतात. अभ्यासासाठी आपण त्याच वर्गीकरण विविध गटात करत असतो. प्रारंभिक भारताच्या इतिहासासाठी उपलब्ध विविध साधन पुढीलप्रमाणे...


ऐतिहासिक साधने
भौतिक/ अलिखित साधने
वाङ्मयीन/ लिखित साधने
वस्तू
वास्तू
धार्मिक साहित्य
अधार्मिक साहित्य
अवशेष
आलेख
नाणी
अलंकार
भांडी
किल्ले
लेण्या
मंदिरे
शहरे
वैदिक
वेद
ब्राह्मणके
आरण्यके
उपनिषदे
पुराणे
महाकाव्य
बौद्ध
त्रिपिटके
बुद्धचरित
महावंश/ दिपवंश
मिलीन्द्पन्हो
जातककथा
सौन्दरानंद
जैन
भगवतीसुत्र
भद्रबाहुचरीत
कल्पसूत्र
परिशिष्टपर्वण
कौटिल्याचे अर्थशास्त्र
विशाखादत्तचे मुद्राराक्षस
कालिदासाचे मालविकाग्नीमित्र
पाणिनीचा अष्टाध्यायी
कल्हनचे राजतरंगणी
बाणभट्टचे हर्षचारीत
शुक्राचार्यांचा शुक्रनितीसार

## • पुरातत्त्वीय/भौतिक साधने-:

प्राचीन भारतातील लोकांना लिखाण कला अवगत नसल्यामुळे इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी मुबलक प्रमाणात लिखित साधने मिळत नाही. त्यामुळे अलिखित साधनांचा आधार घ्यावा लागतो. अलिखित साधनांनाच भौतिक साधने, पुरातत्त्वीय साधने किंवा उत्खननीय साधने म्हणतात. जमिनीखाली गाडलेल्या अवशेषांना पुरावशेष म्हणतात. आणि अशा अवशेषांचा अभ्यास ज्या शास्त्रात केला जातो त्याला पुरातत्त्वशास्त्र (Archaelogy) म्हणतात. त्यांचा परिचय पुढीलप्रमाणे...

### १) अवशेष-:

प्राचीन काळात मानवाने विकास साध्य करत असताना विविध वस्तूंची व वास्तूंची निर्मिती केली. काळाच्या ओघात त्या जमिनीखाली गाडल्या गेल्या. उत्खननात किंवा खोदकामात त्या आपल्याला हाती लागतात. अशा वस्तूंवर रासायनिक प्रक्रिया करून त्यांचा काळ, वय निश्चित करता येते व ते इतिहासाचे साधन म्हणून उपयोगी पडते. सिंधू संस्कृती व त्या पूर्वीच्या मानवाच्या वस्ती, कलाकृती या समजून घेण्यासाठी ही साधने महत्वाचे योगदान देतात. अश्मयुगीन मानव ते नवाश्मयुगीन मानवाची प्रगती ही त्याने तयार केलेल्या दगडी हत्यारे व अवजारे यांच्या माध्यामातून समजते. मानवी हाडांवर केलेल्या कार्बन -१४ या रासायनिक प्रक्रियेमुळे त्या हाडाचे लिंग, काळ, वर्ग काय होता हे समजते. मानवाला लिखाण कला अवगत नव्हती त्यावेळचा मानवी इतिहास समजून घेण्यासाठी हे साधन महत्वाचे आहे.

### २) आलेख-:

दगड व धातूच्या पत्र्यावर कोरलेल्या मजकुराला आलेख म्हणतात. सम्राट अशोकाच्या काळात भारतात मोठ्याप्रमाणात अशा आलेखांची निर्मिती झाली. दगडावर कोरलेल्या लेखाला शिलालेख, दगडी स्तंभावर कोरलेल्या लेखाला स्तंभालेख व तांब्याच्या धातूवर कोरलेल्या लेखाला ताम्रपट अस म्हणतात. आलेखाचे प्रकार खालीलप्रमाणे...

### ❖ शिलालेख-:

दगडावर कोरलेल्या लेखाला शिलालेख असे म्हणतात. साधारण इ.स.पूर्व ३ ऱ्या शतकापासून लेखांच्या निर्मितीला चालना मिळाली. सम्राट अशोकाच्या काळात भारतभर शिलालेख कोरले गेले. अफगानिस्तान जवळ ग्रीक व खरोष्टी लिपीमध्ये वायव्य भारतात अरमाईक व खरोष्टी लिपीत, उत्तर भारतात पाली व ब्राह्मी आणि दक्षिण भारतात प्राकृत व ब्राह्मी लिपीमध्ये शिलालेख आढळतात. गिरनारचा म्हणजेच

जुनागढचा शिलालेख हा भारतातील पहिला संस्कृत शिलालेख आहे. मस्की शिलालेखात सम्राट अशोकाच्या नावाचा उल्लेख आढळतो. कलिंग शिलालेखात अशोकाला कलिंग युद्धाचा झालेला पश्चाताप समजतो. अयोध्या शिलालेखात पुष्यमित्र शुंगाचा राजकीय इतिहास समजतो. अखंड भारताचा उल्लेख खारवेलच्या हातीगुंफा शिलालेखामध्ये येतो. सतीप्रथेचा उल्लेख सर्वप्रथम ऐरण शिलालेखामध्ये येतो. मंदोसर शिलालेख हा विणकर या श्रेणीचा शिलालेख आहे. राबाटक शिलालेख कनिष्क घराण्याची वंशावळ समजून घेण्यासाठी महत्वाचा आहे. नाशिक शिलालेखात सातवाहन-क्षत्रप संघर्ष समजतो.

**शिलालेख कोरण्याची कारणे....**

१.शिलालेख हा राजा, व्यापारी वर्ग कोरत असे.

२. शिलालेख राजाच्या आज्ञ लोकांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी असे.

३. राजाचा पराक्रम, साम्राज्यविस्तार, देणग्या याचा उल्लेख शिलालेखात असतो.

४. राजश्रय प्राप्त धर्माचे नियम, अटी व प्रसार

५. राजाने जनतेसाठी केलेली काम समजण्यासाठी

## ❖ स्तंभालेख-:

दगडी स्तंभावर कोरलेल्या लेखाला स्तंभालेख असे म्हणतात. सम्राट अशोकाने भारतभर स्तंभालेख कोरले आहेत. टोपरा स्तंभलेख हा भारतातील अशोकाचा सर्वात जुना स्तंभलेख आहे. लुम्बिनी या ठिकाणी स्तंभालेखात **“बुद्ध येथे जन्मला”** असे ब्राम्ही मध्ये अशोकाने कोरले आहे. सारनाथ येथील स्तंभावरील चिन्ह आज भारताची राजमुद्रा आहे. रामपूर्वा येथील स्तंभावर बैल (वृषभ) आहे. अशोकाचे जवळपास ४० स्तंभालेख आहेत.

अलाहाबाद येथील स्तंभालेखात समुद्रगुप्ताने नऊ राजांचा पराभव करून गंगा खोऱ्यात राज्यविस्तार केल्याची माहिती मिळते. काशीजवळील भीतरी येथील स्तंभालेखावरून स्कंदगुप्त व हूण संघर्ष समजतो. ऐहोळ स्तंभलेख हा पुलकेशी दुसरा याचा आहे. स्तंभलेखातून साम्राज्यविस्तार, आक्रमणे व राजाची प्रशस्ती समजते.

## ❖ गुहालेख-:

मोठे कातळ कोरून व्यापारी वर्ग व राजा लेण्या खोदत असे. त्यामध्ये कोरलेल्या लेखांना गुहालेख असे म्हणतात. प्राचीनकाळात अनेक राजांनी व व्यापाऱ्यांनी प्रवासामध्ये मुक्कामाची सोय व्हावी म्हणून लेण्या खोदल्या. या लेण्यांच्या आश्रयाला बौद्ध भिक्कू, साधू, मुनी येत असे. कालांतराने ह्या लेण्यांना धार्मिक महत्व प्राप्त झाले. राजांनी किंवा व्यापारी वर्गाने मोठ्याप्रमाणात देणग्या दिल्या. त्याचा उल्लेख लेण्यांच्या छतावर, भिंतींवर लेखात करून ठेवला आहे. सम्राट अशोकाने बाराबर टेकड्या ह्या अजैविक संप्रदायासाठी

कोरलेल्या पहिल्या लेण्या होत्या. त्याठिकाणी सम्राट अशोकाचे तीन गुहालेख आहेत. "जुन्नर नाणेघाट चा गुहालेख" हा भारतातील पहिली महिला शासक राणी नागनिका हिचा गुहालेख आहे. नाशिक कान्हेरी येथील गुहालेखातून सातवाहनांची वंशावळ मिळते.

गुहालेखांमधून राजांच्या वंशावली, लोक उपयोगी कामे, दानांचे उल्लेख मिळतो.

## ❖ ताम्रपट-:

तांब्याच्या पत्र्यावर कोरलेल्या लेखाला ताम्रपट असे म्हणतात. राजा एखाद्या व्यक्ती अथवा मंदिरास गाव इनाम म्हणून दान देत असताना तो तांब्याच्या पत्र्यावर कोरून देत असे. यात दान देणाऱ्या राजाची वंशावळ, दान घेणाऱ्या व्यक्ती, मंदिराचा उल्लेख, रक्कम किंवा जमिनीचा उल्लेख, कलावधी,अधिकार याचा तपशील मिळतो. राजाचे धार्मिक धोरण व तत्कालीन समाज जीवन समजून घेण्यासाठी ताम्रपटाचा उपयोग होतो. चालुक्य राजा कामदेव चा राजापूर ताम्रपट, हर्षवर्धनचा बासरखेडा ताम्रपट महत्वाचे आहेत.

## ❖ नाणी-:

नाणी हे इतिहासाचे बोलके साधन आहे. मानवाचे आर्थिक व्यवहार सोयीस्कर व्हावे यासाठी चलन, नाणं किंवा मुद्रा तयार केल्या. कारण वस्तूविनिमय पद्धतीमध्ये अनेक तोटे होते. हडप्पा संस्कृतीमध्ये २००० पेक्षा जास्त मुद्रा सापडतात. एकट्या मोहंजोदाडो या शहरात १२०० च्या वर मुद्रा सापडतात. सुरुवातीच्या काळात मातीचे खापरे, चामड्याचे तुकडे नाणी म्हणून वापरली जात असे. धातूचा शोध लागला आणि नाणी तयार करण्यासाठी धातूचा उपयोग मानव करू लागला.

सुरुवातीच्या काळात PMC (Punch Mark Coin) म्हणजेच आहत नाणी पाडली जात असे. शिक्याच्या सहाय्याने धातूच्या तुकड्यावर दाब देऊन नाणी तयार करण्याची ही पद्धत आहे. त्यामुळे ह्यामध्ये धातूला विशिष्ट आकार प्राप्त होत नसे. नाण्याचा धातू साच्या बाहेर जात असे. सुरुवातीच्या टप्यात नाणी चौकोनी, आयताकृती, षटकोनी अशा विविध आकाराची असे. पुढे नाणी ही धातू वितळवून ओतीव काम करून बनवण्यास सुरुवात झाली. इ.स.च्या १ ल्या शतकापासून नाण्याला गोलाकार आकार दिसून येतो. राज्याची आर्थिक बाब डोळ्यासमोर ठेवून राज्यकर्ते नाणी पाडत असत. ग्रीक शासकांनी नाण्यावर राजाची मुद्रा पडण्याची कल्पना भारतात आणली. कुशाण राजा कनिष्क याची सोन्याची नाणी सापडतात. प्राचीन भारताच्या इतिहासात गुप्तांच्या कार्यकाळ मोठ्याप्रमाणात सोन्याची नाणी प्रचलित होती. त्यामुळे तो कार्यकाळ सुवर्णयुग म्हणून ओळखला जातो.

नाण्यांचे इतिहासातील महत्व लक्षात घेऊन नाण्यांच्या अभ्यासासाठी "नाणकशास्त्र" ही स्वतंत्र शाखा सुरु केली. नाण्यांच्या अभ्यासातून तत्कालीन आर्थिक, राजकीय. धार्मिक, सामाजिक व भौगोलिक माहिती

समजते. नाण्यावर राजाची प्रतिमा कोरत असे. त्याच बरोबर राजाची कुलदैवताची व राजा कोणत्या धर्माचा, पंथाचा उपासक आहे ह्याची माहिती मिळविण्यास मदत होते. कानिष्काच्या नाण्यावर गौतम बुद्धांचे चित्र व ग्रीक लिपीत लेख होता. गुप्त घराण्यात समुद्रगुप्ताच्या नाण्यावरील प्रतिकृती मुळे समुद्रगुप्त हा वीणावादक होता हे समजते.

प्राचीन भारताच्या इतिहासाचे साधन म्हणून नाण्यांचे महत्व :

### १. आर्थिक माहिती :

नाणे ज्या धातूचे आहे, त्यावरून तत्कालीन राजाची अर्थव्यवस्था ही कशी होती ह्याची कल्पना येते. नाणे जर सोन्याचे असेल तर आर्थिक सुबत्ता व ते जर जस्त किंवा तांब्याचे असेल तर आर्थिक टंचाई असा अंदाज बांधतो येतो.

### २. धार्मिक माहिती :

नाण्यावर कोरलेल्या देवतांच्या चित्रामुळे तत्कालीन राजा किंवा व्यापारी कोणत्या धर्माचा उपासक होता ह्याची माहिती मिळते. कानिष्काच्या नाण्यावर गौतम बुद्ध, गुप्तांच्या नाण्यावर शंख, चक्र, गदा किंवा कार्तिकेय यांचे चित्र असत.

### ३. राजकीय माहिती :

ग्रीकांनी भारतात नाण्यावर राजाची प्रतिमा कोरण्याची कल्पना विकसित केली. तत्पूर्वी भारतात राजाचे नाव कोरले जात असे. राजाचे नाव व प्रतिमा यावरून तत्कालीन राजकीय इतिहासाचा उलगडा होतो.

### ४. सामाजिक माहिती :

नाण्यावर कोरलेल्या राजाच्या व राणीच्या प्रतीमावरून तत्कालीन समाजातील वेशभूषा, केशरचना, अलंकार यांची माहिती मिळते. महिलांची सामाजिक स्थिती समजते.

### ५. भौगोलिक माहिती :

ज्या प्रदेशापर्यंत अशा नाण्यांचा संग्रह उत्खननात सापडतो. ह्यावरून त्या राजाचा प्रदेशविस्तार समजतो. सातवाहन घराण्याची नाणी ग्रीक मध्ये सापडतात. ह्यावरून ग्रीक लोकांशी व्यापारी संबंध समजतो.

### ६. तत्कालीन लिपी :

नाण्याच मूल्य, कार्यकाळ, सत्ता निश्चित करण्याच्या उद्देशाने नाण्यावर विविध लिपीचे मजकूर उपलब्ध होतात. यावरून तत्कालीन समाजात प्रचलित लिपी समजते.

## ३) वीरगळ-:

वीरगळ परंपरा ही कर्नाटकातून महाराष्ट्रात आली असे मानले जातात. कर्नाटक राज्यात मोठेमोठे



वीरगळ आढळून येतात, त्यातील काही वीरगळ हे शिलालेखांनी युक्त आहेत. महाराष्ट्रात शिलालेख कोरलेले वीरगळ तुलनेने कमी आहेत. कानडी भाषेत कल्लू म्हणजे दगड. वीरकल्लू म्हणजे वीरांचा दगड. त्यावरून महाराष्ट्रात वीरगळ असा शब्द प्रचलित झाला असावा.

वीरगळ म्हणजे वीर पुरुषांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेला (सहसा - दगडांचा अथवा लाकडाचा) स्तंभ असतो. यास वीरस्तंभ असेही म्हणतात. महाराष्ट्रात जुन्या देवळांच्या बाहेर वीरगळ आढळतात.

## ❖ वीरगळाचे स्वरूप-:

वीरगळाचे सामान्यपणे तीन किंवा पाच भाग असतात. सर्वांत खालच्या भागात वीर युद्धात लढत आहे, असे दाखवलेले असते. यातून लढाईचे कारण सुद्धा स्पष्ट होते. उदा. गाईसाठी लढाई, घोड्यासाठी लढाई इ. मधल्या भागात वीर देवदूत किंवा अप्सरांच्या बरोबर स्वर्गात जात असल्याचे म्हणजेच वीराचा मृत्यू झाल्याचे दाखवलेले असते. सर्वांत वरच्या भागात वीर योद्धा कैलास

पर्वताला गेला आहे आणि शंकराच्या पिंडीची पूजा करत आहे, असे दाखवलेले असते.युद्धात मरण आल्यास स्वर्गलोकप्राप्ती होते असे यातवून सुचवायचे असावे. काही वीरगळ हे चंद्र सूर्य यांनी अंकित असतात. आकाशात चंद्र सूर्य तळपत आहेत तोपर्यंत या वीरांची स्मृती कायम राहिली असे यातून सूचित करायचे असावे. काही वीरगळ हे सतीच्या हाताने अंकित असतात. एखाद्या बलिदान केलेल्या वीराची पत्नी त्याच्यासह सती गेली असेल तर तिचे ते स्मारक मानले जाते. या स्मारक शिळांवर कोणाचेही नाव नसते फक्त चित्रे कोरलेली असतात. त्यावरून त्या वीराचे वीरकृत्य समजून येते.काही वीरगळांवर शिलालेखही असतात.

## ४) सतीची शिळा-:

युद्धात मृत्यु आलेल्या वीरांची पत्नी जेव्हा सती जाते तिच्या स्मरणात ही शिळा उभारली जात असे. ह्या शिळेत एक हात त्यात हातात बांगड्या आणि हाताच्या वर सूर्य आणि चंद्र असे, म्हणजेच जोपर्यंत सूर्य आणि चंद्र आहेत तोपर्यंत ह्या सतीची आठवण राहील. इतिहासाच्या दृष्टीने हे खूप महत्वपूर्ण साधन आहे. त्यावरून तत्कालीन सामाजिक रूढी, परंपरा, व्यवस्था, चालीरीती कळण्यास मदत होते.



## ५. वास्तू :

१. **किल्ले** : पुरातत्वीय साधनांमध्ये किल्ले देखील तेवढचे साधन म्हणून महत्वाचे आहेत. सातवाहन राजवटीमध्ये पच्छिम घाटात अनेक किल्ले बांधले होते. ज्यामध्ये जीवधन, हडसर, शिवनेरी, चावंड हे किल्ले येतात. विजयदुर्ग (पूर्वीचा घेरिया) हा जलदुर्ग शिलहार राजांनी बांधला होता.

२. **लेण्या** : व्यापारी वर्ग व राजे लेण्या ह्या प्रामुख्याने व्यापारी मार्गावर लेण्या ह्या व्यापारी वर्गासाठी निवासाची व्यवस्था व्हावी यासाठी बांधत असे. कालांतराने बौद्ध, हिंदू, जैन या धर्माचा विकास व प्रसार करण्यात लेण्यांनी विशेष योगदान दिले.

३. **मंदिरे** : प्राचीन भारताच्या इतिहासात मंदिरांचे अधिक महत्वाचे आहे. इ.स.६ व्या शतकानंतर भारतात मंदिर स्थापत्य कलेचा विकास सुरु झाला. राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य, चौल, पाल या घराण्याने प्रामुख्याने मंदिर स्थापत्यामध्ये आपले योगदान दिले. अखंड दगडात कोरलेले कैलास मंदिर राष्ट्रकुट राजा कृष्ण तिसरा याने बांधले. चौल राजा राजराजा, राजेंद्र चौल यांनी देखील मंदिरे उभारली.

४. **शहरे :** जगातील सर्वात प्राचीन शहरी संस्कृती भारतात असून हडप्पा संस्कृती म्हणून ओळखली जाते. हडप्पा, मोहंजोदाडो, कालीबंगन इ. शहरे व लोथल हे बंदर या संस्कृतीची शहरे आहेत. शहरी रचना, सांडपाणी व्यवस्था, मनुष्य वस्ती, काटकोनी रस्ते हे ह्या शहरांचे वैशिट्य आहे.

## ❖ वांड.मयीन साधने/ साहित्यिक साधने-:

## धार्मिक साधने-:

- ## वैदिक साहित्य/ हिंदू साहित्य-:

## १) वेद-:

वेद हा शब्द “विद” या शब्दापासून तयार झाला आहे. “विद” म्हणजे जाणून घेणे. “वेद” या शब्दाचा अर्थ ज्ञान असा होतो. वेद हे भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात प्राचीन साहित्य म्हणून ओळखले जाते. वेद हे अपौरुषेय आहेत, म्हणजेच ते मनुष्यनिर्मित नाही तर दैवी आहेत. वैदिक साहित्य हे मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित झालेले आहे, म्हणून त्यांना “श्रुती-स्मृती” म्हणतात. एकूण वेदांची संख्या चार आहे. आणि ते संस्कृत भाषेत लिहिलेले आहेत.

### ❖ ऋग्वेद-:

जगातील व चार वेदांपैकी सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणजे ऋग्वेद होय. ऋग्वेदात १० मंडले(भाग), १०२८ सूक्ते(स्रोत्र) हे स्रोत विविध देवता व निसर्ग शक्तींच्या प्रार्थनांशी संबंधित आहेत. आणि १०५५२ मंत्र आहेत. आर्य लोकांबद्दलची माहिती जाणून घेण्यासाठी आणि त्यांचे राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन कसे होते हे समजून घेण्यासाठी ऋग्वेद महत्त्वाचा आहे.

### ❖ यजुर्वेद-:

यज्ञासंबंधी माहिती देणारा ग्रंथ म्हणजे यजुर्वेद होय. म्हणजेच यज्ञ कसा करायचा? यज्ञ करताना कुठले नियम पाळायचे? यज्ञ करत असताना कुठले मंत्र म्हणायचे? याचे संकलन यजुर्वेदात आहे. यजुर्वेदाच्या "कृष्ण यजुर्वेद" आणि "शुक्ल यजुर्वेद" अशा दोन शाखा आहेत.

### ❖ सामवेद-:

प्राचीन भारतीय संगीत जाणून घेण्यासाठी सामवेद हा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. सामवेदाला भारतीय संगीताचा पाया म्हणतात. ऋग्वेद व यजुर्वेद यांत असणारे मंत्र सुरा- तालात गाण्याच्या स्वरूपात कसे म्हणायचे याविषयीची माहिती सामवेदात आहे.

### ❖ अथर्ववेद-:

अथर्ववेदात मानवी जीवनाच्या विविध पैलूंचे संदर्भ येतात. आनंद, दुःख, सुख, शांती समृद्धी, आरोग्य, त्यासंबंधीचे उपचार, शारीरिक, मानसिक, रोगांचे उपचार तसेच गणित विज्ञान, संगणक, ज्योतिष, रसायनशास्त्र इत्यादींची ही माहिती यात आहे. त्याचबरोबर जादूटोणा, तंत्र-मंत्र, वशीकरण यासंबंधीही माहिती अथर्ववेदात भेटते. "अरुंधती" नावाच्या औषधी वनस्पतीचा उल्लेख अथर्ववेदात आढळतो.

## २) वेदांग-:

वेदांगांची संख्या सहा आहे, ते पुढीलप्रमाणे. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष.

## ३) ब्राम्हण्ये/ ब्राम्हणग्रंथ-:

वेद हे समजण्यासाठी अतिशय क्लिष्ट असल्यामुळे त्यांचा अर्थ समजून घेण्यासाठी पुढे आलेल्या गद्यात्मक ग्रंथांना "ब्राह्मण्ये/ ब्राम्हणग्रंथ" असे म्हटले जाते. यांना वेदांची "परिशिष्टे" म्हणतात. यात वेदांमध्ये दिलेल्या माहितीचे स्पष्टीकरण दिलेले आहे. ब्राह्मणग्रंथांची संख्या १८ आहे.

## ४) आरण्यके-:

अरण्यात जाऊन एकांतात ऋषीमुनींनी वेदांचे स्पष्टीकरण करणारे ग्रंथ तयार केले. अवघड असणारे वेद ग्रंथ एकांतात समजून घ्यावे लागतात. विद्वानांनी असे अरण्यात वेदांचे स्पष्टीकरण करणारे ग्रंथ निर्माण केले त्यास आरण्यके म्हणतात.

## ५) उपनिषद-:

उपनिषद शब्दाचा अर्थ गुरु जवळ बसणे होय. गुरु जवळ बसून समजावून घेण्याच्या प्रक्रियेतून निर्माण ग्रंथ "उपनिषद" किंवा "वेदांत" म्हणून ओळखले जातात. उपनिषदांची संख्या १०८ आहे.

## ६) महाकाव्य-:

वैदिक साहित्य रामायण व महाभारत ही दोन महाकाव्य आहे. रामायण हे प्रामुख्याने २४ हजार श्लोकांचे व ७ कांडांचे आहे. हे महाकाव्य वाल्मिकी यांनी रचलेले आहे. महाभारत हे महाकाव्य महर्षी व्यासांनी रचित असून ते एक लाख श्लोकांचे आहे. महाभारत ज्यावेळेस दहा हजारच लोकांचे होते तेव्हा त्याला 'जय' असे म्हटले जात असे. ज्यावेळेस ते पंचवीस हजार श्लोक लिहून पूर्ण झाली त्यावेळेस त्याला भारत असे नाव पडले. व एक लाख लोकांची रचना पूर्ण झाल्यावरती त्याला महाभारत म्हटले जाऊ लागले या दोन्हीही महाकाव्यांमधून तत्कालीन लोक जीवन, राजाची कर्तव्य याची माहिती मिळते. हे दोन महाकाव्य लिहत असताना लोकांचे मनोरंजन करणे आणि त्यांच्यापुढे आदर्श निर्माण करणे हा लेखनकर्त्यांचा उद्देश होता. म्हणून हे साधन इतिहासासाठी वापरताना ते आपल्या संशोधनाच्या विषयानुरूप तपासून घेतले पाहिजे.

## ७) पुराणे-:

पुराणांची संख्या १८ आहे. हे संस्कृत भाषेतील प्राचीन भारतीय ग्रंथ आहेत, ते पुढीप्रमाणे-:

अग्नी पुराण, कूर्म पुराण, गरुड पुराण, नारद पुराण, पद्म पुराण, ब्रम्ह पुराण, ब्रम्हवैवर्त पुराण, ब्रम्हांड पुराण, भविष्य पुराण, भागवत पुराण(देविभागवत पुराण), मत्स्य पुराण, मार्कंडेय पुराण, लिंग पुराण, वराह पुराण, वामन पुराण, वायू पुराण(शिव पुराण), विष्णू पुराण, स्कंद पुराण.

पुराणातील माहितीमध्ये अतिशयोक्ती आढळते. त्यांचा कालक्रमही चुकीचा वाटतो. पुराणात कल्पितकथा, दंतकथा, अख्यायिका आहेत.

- ## बौद्ध साहित्य-:

बौद्ध साहित्याचा काळ हा साधारणता इसवी सन पूर्व ६ व्या शतकानंतरचा मानला जातो.बौद्ध धर्मातील साहित्य हे पाली भाषेत आहे. बौद्ध धर्माच्या एकूण चार धम्म परिषदा झाल्या. ज्यामध्ये या साहित्यकृतीच्या रचनेला चालना मिळाली. बौद्ध साहित्य मध्ये त्रिपेटकांना विशेष महत्त्व आहे. बौद्ध धर्माचा अभ्यास करण्याच्या अनुषंगाने, गौतम बुद्धांची शिकवण समजून घेण्याच्या उद्देशाने बौद्ध साहित्याचा महत्त्वाचा वाटा आहे.

## १) त्रिपिटके-:

**विनयपिटक** : या ग्रंथाची रचना ऊपाली नामक गौतम बुद्धांच्या शिष्येने पहिल्या धम्म परिषदेमध्ये केली असे म्हटले जाते. या ग्रंथांमध्ये बौद्ध भिक्खू-भिक्षुणी व उपासक यांना घालून दिलेल्या बौद्ध धर्माच्या अटी व नियमांचा उल्लेख येतो.

**सुत्तपिटक** : गौतम बुद्धांची शिकवण व त्यांच्या शिकवणीचा सार या ग्रंथामध्ये दिला असून या ग्रंथाची रचना गौतम बुद्धांचा शिष्य आनंद यांनी केली असावी असे म्हटले जाते.

**अभिधम्मपिटक** : या ग्रंथामध्ये बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाची व बौद्ध धर्मपरीषदेची सांगोपांग चर्चा आढळून येतात.

**२) महावंश/ दीपवंश :** बौद्ध धर्माच्या इतर ग्रंथांमध्ये या ग्रंथांचा देखील समावेश होतो. हे ग्रंथ प्रामुख्यानं सिहली लिपित लिहिलेले असून ते श्रीलंकेमध्ये मिळालेले आहेत. यावरून बौद्ध धर्माचा विस्तार लक्षात येतो. तसेच चंद्रगुप्त मौर्याच्या शासनाची माहिती भेटते.

**३) मिलिंदपन्हो :** ग्रीक राजा मिनँडर म्हणजेच मिलिंद व बौद्ध भिक्खू नागसेन यांच्यामधील बौद्ध धर्म तत्त्वज्ञानाविषयी च्या चर्चा यांचे वर्णन या ग्रंथामध्ये येते. हा ग्रंथ प्रश्नोत्तराच्या स्वरुपात आहे. मिलिंदाने बौद्ध धर्माच्या विषयी पडलेल्या प्रश्नांची उत्तरे नागसेन याने दिली व त्यानंतर मिलिंदने बौद्ध धर्म स्वीकारला. या ग्रंथावरून तत्कालीन राजकीय परिस्थिती समजते. तसेच ग्रीक राजा मिनँडर ची कालनिश्चिती करणे सोपे होते.

**४) बुद्ध चरित्र :** अलंकारिक असे गौतम बुद्धांचे चरित्र म्हणजेच बुद्ध चरित्र हे लिखाण अश्वघोषाने लिहिले असून यामध्ये गौतम बुद्धांच्या जीवन चरित्राचा आढावा घेतलेला आपल्याला दिसतो.ऐतिहासिक दृष्टीकोनातून साधी, सोपी, सरळ भाषा हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

**५) सौदरानंद :** या ग्रंथात नंदाची कथा सांगितली आहे. या ग्रंथामध्ये गौतम बुद्ध आपल्या सावत्र भावास म्हणजे नंदाला स्वर्ग सुखापेक्षा निर्वाण पद कसे श्रेष्ठ आहे पटवून देत आहेत. आणि नंदाला बौद्ध धर्माची दीक्षा देतात. हा कथास्वरूप ग्रंथ अश्वघोषाने लिहिलेला आहे.

**६) जातक कथा :** गौतम बुद्धांच्या पुर्वजन्माशी सबंधित ह्या कथा आहेत. आत्तापर्यंत ५५० पर्यंत जातक कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. या कथांतून गौतम बुद्धांच्या जन्मापूर्वीची सामाजिक आर्थिक राजकीय धार्मिक सांस्कृतिक परिस्थिती समजते.

**७) ललितविस्तार-:** हा ग्रंथ महायान पंथाचा महत्वपूर्ण ग्रंथ आहे. ज्यात गौतम बुद्धांविषयी माहिती भेटते.

- ## जैन साहित्य-:

इसवी सन पूर्व सहाव्या शतकामध्ये जैन धर्माचा उदय झाला. जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर वर्धमान महावीर यांनी साध्या व सोप्या अर्धमागधी भाषेत तत्वज्ञान आपल्या अनुयायांना सांगितले. जैन साहित्याला “**आगम”** म्हणतात.अनुयायांनी ते मौखिक परंपरेतून जतन करून ठेवले. इसवीसन सहाव्या शतकात वल्लभी येथील पहिल्या जैन परिषदेमध्ये हे साहित्य संग्रहित करण्यात आले. जैन साहित्यातूनच पुढे कानडी भाषा विकसित झाली. जैन साहित्य पुढीलप्रमाणे....

१) **अंग-:** अंगांची संख्या १२ आहे. यात जैन धर्माच्या सिद्धांताची चर्चा केलेली आहे.

२) **उपांग-:** उपांगांची संख्या १२ आहे. अंग ची माहिती समजून घेण्यासाठी उपांगांची रचना केली आहे. यात अंग चा विस्तार केला आहे.

३) **प्रकीर्ण-:** प्रकीर्णांची संख्या १० आहे.अंग आणि उपांगांची हि परिशिष्ट आहेत.यात अंग आणि उपांगाचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

४) **छेदसूत्र आणि मुलसुत्र-:** छेदसूत्राची संख्या ६ तर मुलसुत्राची संख्या ४ आहे. जैन धर्मातील भिक्षु आणि भिक्षुणी यांनी आचरणात आणायचे नियम छेदसूत्र आणि मुलसुत्र यात दिलेले आहे.

५) **भगवतीसुत्र-:** हा जैन धर्माचा महत्वपूर्ण ग्रंथ आहे. यात वर्धमान महावीर आणि अन्य जैन भिक्षूंच्या चरित्राची माहिती भेटते. तसेच यात १६ महाजनपदांचा उल्लेखही आढळतो.

६) **भद्रबाहुचरित**-: रत्ननंदी या लेखकाने हा ग्रंथ लिहिला आहे. मौर्य साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य याची माहिती यात भेटते.

७) **कल्पसूत्र-:** दिगंबर पंथाचा संस्थापक भद्रबाहू याने हा ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ संस्कृत मध्ये आहे. ज्यात जैन धर्माच्या प्रारंभिक इतिहासाची माहिती भेटते.

८) **परिशिष्टपर्वण-:** हे संस्कृत महाकाव्य हेमचंद्र या लेखकाने लिहिले आहे. ज्यात जैन शिक्षकांच्या इतिहासाचे तपशीलवार वर्णन दिले आहे.

## ❖ अधार्मिक साहित्य-:

### १ .कौटील्याचे अर्थशास्त्र-:

कौटिल्य म्हणजेच चाणक्य/विष्णुगुप्त याने लिहिलेल्या हा ग्रंथ राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टीने आद्यग्रंथ मानला जातो. ग्रंथाचे नाव जरी अर्थशास्त्र असले तरी मोठ्या प्रमाणात तत्कालीन राजकीय माहिती या ग्रंथातून भेटते. चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात असलेला हा कौटिल्य अर्थशास्त्र या ग्रंथातून राजाची कर्तव्य, राज्य सुरळीत चालविण्यासाठीच्या योजना, गुप्तहेर, युद्धरचना यांचे वर्णन या ग्रंथात करतो. त्याचबरोबर तत्कालीन शेती, व्यापार, युद्धपद्धती, हेरयंत्रणा व कौटील्याची कुटनीती समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्वपूर्ण आहे.

### २ . विशाखादत्तचे मुद्राराक्षस-:

या ग्रंथात चंद्रगुप्त मौर्य आणि नोंद वंशाचा अखेरचा शासक धनानंद यांच्यात झालेल्या संघर्षाची माहिती भेटते तसेच मौर्य घराण्याच्या राजकीय इतिहासाचा सुरुवातीचा टप्पा जाणून घ्यायचा असेल तर हे नाटक महत्वपूर्ण आहे.

### ३ .कालिदासचे मालविकाग्नीमित्र-:

या नाटकातून शुंग वंशाची माहिती भेटते. विदर्भकन्या मालविका आणि अग्नीमित्र यांच्या विवाहावर आधारित हे नाटक आहे. त्याचबरोबर शुंग वंशाचा पराक्रमी शासक पुष्यमित्र शुंग याचा ग्रीकांशी झालेला संघर्षाची माहिती सुद्धा यात मिळते.

### ४.पाणिनीचा अष्टाध्यायी-:

प्राचीन भारतीय भाषा, व्याकरण, शिक्षणपद्धती जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्वपूर्ण आहे. त्याचबरोबर मौर्यपूर्वकालीन भारताची राजकीय, सामाजिक, धार्मिक, परिस्थिती समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्वपूर्ण

### ५. कल्हणचे राजतरंगिनी-:

काश्मीरचा इतिहास जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्वपूर्ण ठरतो. तसेच प्रादेशिक इतिहासाचे हे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. कल्हणने तत्कालीन काळातील राजाच्या दरबारातील दफ्तरखाण्यातील विविध कागदपत्रे, दानपत्रे, आज्ञापत्रे यांचा परिश्रमपूर्वक अभ्यास करून हा ग्रंथ लिहिला आहे

### ६.शुक्राचार्यांचा शुक्रनीतीसार-:

प्राचीन भारतातील राज्यव्यवस्था समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरतो. राज्यव्यवस्थेतील विविध पैलू म्हणजेच मंत्री, मंत्रिमंडळ, मंत्रीपरिषद, शासकीय कर्मचाऱ्यांची कर्तव्य, परराष्ट्र धोरण जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्वपूर्ण आहे.

### ७.बाणभट्टचे हर्षचरीत-:

वर्धन घराण्याचा पराक्रमी सम्राट हर्षवर्धन याचे चरित्र बाणभट्ट याने लिहिले आहे. हर्षवर्धनचा जिवनवृत्तांत तत्कालीन राजकीय, सामजिक, धार्मिक परिस्थिती, बौद्ध धर्माचा प्रसार ही सर्व महिती या ग्रंथातून भेटते.

### ८. संगम साहित्य-:

दक्षिण भारताचा इतिहास समजून घेण्यासाठी तमिळ भाषेतील संगम साहित्य खूप महत्त्वाचे आहे. या संगम साहित्यातून आपल्याला तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थिती समजून घेण्यास मदत होते. तिरूवल्लुर, कुरल, शिल्पादीकारम, मणिमैखलै, तोलकाप्पियम, पत्तुप्पात्तू, इलंगो अडिगल, सितलैसत्तनार या संगम साहित्यवरून दक्षिण भारताचा इतिहास समजतो. चेर, चोळ, पांड्य यांच्या कालखंडात हे संगम साहित्य निर्माण झालेले आहे.

## ❖ परकीय प्रवासवर्णने-

### १.मॅगेस्थेनिस :

हा ग्रीक राजदुत इ.स.पु. ३ मध्ये चंद्रगुप्त मौर्यच्या दरबरात होता. याने 'इंडिका' नामक ग्रंथामध्ये मौर्य काळातील राजकीय परिस्थितीचे वर्णन केले आहे. परंतु दुर्दैव हे की इडिका नावाचा हा मूळ ग्रंथ आज उपलब्ध नाही. परंतु जस्टिन, स्ट्रेबो, या लेखकांच्या लिखाणात इंडिका ग्रंथातील उतारे सापडतात. मॅगेस्थेनिसने मौर्य काळात दरबारात महिला अंगरक्षक असल्याचे वर्णन त्याच्या लिखाणात केले आहे.

### २. टॉलेमी :

हा प्रवासी भारतात इ.सनाच्या २ ऱ्या शतकात येऊन गेला. तो भूगोल शास्त्रज्ञ होता. त्याने भारताच्या भौगोलिक प्रदेशांचे वर्णन **"Guide To Geography"** या ग्रंथात केले आहे.

### ३. फाहियान (इ.स. ३९९ ते ४११) :

चंद्रगुप्त दुसरा याच्या काळात हा चिनी प्रवासी भारतात आला. तो येताना खुश्कीच्या मार्गाने तर जाताना समुद्रमार्गाने गेला. आपल्या यात्रेत त्याने ३० देशांना भेटी दिल्या. बौध्द धर्म व धर्मग्रंथांचा अभ्यास करणे व चीनी भाषेत त्याचे रूपांतरण करून चीनला घेऊन जाण्याच्या उद्देशाने तो भारतात आला होता. भारतभर त्याने ६ वर्ष प्रवास केला. त्यात त्याने बौध्द धर्माच्या स्थळांचे वण केले आहे. नालंदा, वैशाली, गया, राजगृह हया स्थळांना त्याने भेटी दिल्या होत्या. तो ज्या राज्याच्या काळात भारतात आला त्याचे वर्णन तो करत नाही तसेच त्या काळातील प्रसिध्द वैदिक धर्माचे वर्णन तो आपल्या लेखात करत नाही. तो एका ठिकाणी चांडाळांचा उलेख्ख करतो की, हे लोक गावाबाहेर राहतात. हे लोक गावात प्रवेश करताना काठी आपठत येतात. कारण यांचा स्पर्श हा विटाळ समजला जात असे. एकंदर फाहियानच्या लेखातुन तत्कालिन परिस्थितीचा आढावा घेता येतो.

### ४. ह्युएनसंग :

हा चीनीप्रवासी भारत ७ व्या शतकाच्या मध्यंतरी आला. त्यावेळी उत्तर भारतात वर्धन घराण्याच्या हर्षवर्धनचे राज्य होते. आपल्या बुध्दीमतेच्या जोरावर ह्युएनसंगने हर्षवर्धनच्या दरबरात स्थान प्राप्त करून घेतले होते. हर्षवर्धनच्या कनोजच्या बौध्द धर्म परिषदेचा तो मुख्य होता. त्याने चीनमध्ये जाताना भारतीय प्रवासावर **'सियुकी'** नावाचा ग्रंथ लिहला.

### ५. इत्सिंग :

हा चीनीप्रवास्याने भारताचा इ.स.६७२ ते इ.स.६८८ या काळात प्रवास केला. तो आपल्या प्रवासात जास्त काळ नालंदा विद्यापीठात राहिला. त्यामुळे त्याच्या लिखाणातून आपल्याला त्याविषयी जास्त माहिती मिळेते. गौतम बुध्दाविषयी तो अस लिहतो की, "बुद्ध सर्वसामान्य लोकांत मिसळणारा होता त्याची भाषा अत्यंत साधी सोपी सरळ होती जी सर्वसामान्य जनतेला समजत होती". त्यामुळे हा धर्म जास्त प्रसिध्द झाला. भारतीय लोकांच्या राहणीमानाबाबत, आरोग्याबाबत, पोशाखाबाबत तो वर्णन करतो.

प्राचीन काळात असे अनेक परकिय प्रवासी भारतात आले. काही ठराविक प्रवासी सोडले तर अनेक प्रवासी हे जास्त काळ एका ठिकाणी राहिले नाही. त्यांना भारतीय भाषेचे ज्ञान परिपूर्ण नव्हते. त्यामूळे यांचे लिखाण अतिशयोक्तीपुर्ण असणे नाकारता येत नाही.

## क.पुराश्मयुग, मध्याश्मयुग, नवाश्मयुग आणि ताम्रपाषायुगीन संस्कृती-: संक्षिप्त आढावा.

### ❖ अश्मयुग :

मानवाच्या उत्त्पतीपासुन मानवाने हत्यार म्हणुन दगडांचा वापर सुरू केला. तेव्हापासुन अश्मयुगाचा प्रारंभ झाला. मानव हा जरी बुध्द्धमान प्राणी असला तरी प्राथमिक अवस्थेमध्ये मानवाला दगड सोडुन इतर धातू विषयी कल्पना नव्हती. मानव हा शिकार करण्यासाठी किंवा स्वतःचे संरक्षण करण्यासाठी दगडी हत्यारांचा वापर करत असे. प्रारंभिक अवस्थेत मानवाने ओबडधोबड दगडांचा वापर सुरू केला. परंतु आपल्या बुद्धीमतेच्या जोरावर त्याने हत्यारांमध्ये टप्प्याटप्प्यावर बदल घडवून आणले. अश्मयुगीन मानवाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी हत्यारांच्या आधारे तीन टप्यामध्ये अश्मयुगाचे वर्गीकरण केले जाते.


१. पुराश्मयुग (Early Palaeolithic period)


२. मध्याश्मयुग (Middle Palaeolithic period)

३. नवाश्मयुग (Late Palaeolithic period)

## १. पुराश्मयुग-:

अश्मयुगाची अगदी प्रारंभिक कालखंडाला पुराश्मयुग म्हणतात. या काळात मानवाकडे अगदी ओबडधोबड स्वरूपातील हत्यारे होती. अगदी सुरुवातीची हजारो वर्ष मानवाला हत्यारांना कलाकौशल्य करून तीक्ष्ण व हलकी करण्यात गेला.या वरून प्राथमिक अवस्थेत मानवाच्या प्रगतीचा आलेख मंद गतीचा होता असे दिसते. हिमयुग असल्यामुळे मानव हा सतत स्थलांतर करत असल्यामुळे नवीन प्रदेशात उपलब्ध होणा-या दगडापासून तो नवीन हत्यारे तयार करत असे. शिकार करणे व अन्न गोळा करणे असे एकांतीक भटके जीवन तो जगत होता. हया प्राथमिक अवस्थेत तो किमान दगडाचा वापर करू लागला हेच विशेष आहे. हया प्रथमिक अवस्थेत मानवाच्या सांस्कृतीक जीवनाला सुरुवात झाली नव्हती.






## २. मध्याश्मयुग-:

अश्मयुगातील मानवाचा ह्या मध्याकाळातील प्रवास दीर्घ आहे. ह्या काळाची सुरुवात साधारणत तीन लाख वर्षापूर्वीपासून होते ते अगदी तीस हजार वर्षापर्यंत होय. ह्यावरून मानवाचा बौद्धिक व शारीरिक विकास हा मंद गतीने होता हे दिसून येते. या काळाचे वैशिष्ट्य म्हणजे पूराश्म काळातील हत्यारांच्या तुलनेत ह्या काळात हत्यारांना विशिष्ट आकार देऊन अनुकुचीदार केले गेले. वजनाने ती काही प्रमाणात हलकी झालेली

आढळतात. त्याचप्रमाणे ह्या काळात मानवाने हत्यारे तयार करण्यासाठी दगडाबरोबरच हाडे, लाकूड यांचाही वापर केला.


ह्या काळातील मानव शिकार व हिंस्त्र प्राण्यापासून संरक्षण करण्यासाठी समूहाने राहू लागला. रानात सापडणारी कंदमुळे, फळे व सामुहिक शिकार करून मिळवलेले कच्चे मांस खाऊन तो उपजीविका करत असे. एकाच ठिकाणी दीर्घकाळ त्याला ह्या गोष्टी उपलब्ध होत नव्हत्या, त्यामुळे त्याचे जीवन हे अस्थिर होते. ह्या काळाच्या अगदी शेवटाला मानवाला अग्नीचा शोध लागला. कच्चे मांस खाणारा मानव आता आगीवर शिजवून खावू लागला.इतर प्राण्यांच्या तुलनेत ह्या काळातील मानवाचा मेंदू मोठा होता. त्याने हात व बोटे वापरून आपली प्रगती केली. ह्याच काळात तो खुणांचा वापर न करत शब्दोच्चार करून संवाद साधू लागला. भारतात **मध्यप्रदेशातील भीमबेटका** येथील गुफांमध्ये मध्याश्मयुगातील मानव राहत असल्याचा पुरावा मिळतो. त्यात बैल, हरीण, गेंडा, यांची चित्रे कोरलेले आढळतात.



## ३.नवाश्मयुग-:

आधीच्या अश्मयुगाच्या तुलनेत मानवाने या काळात उल्लेखनीय प्रगती केलेली आढळते. त्याच्या जीवनात मोठयाप्रमाणात बदल झालेला दिसतो. नवाश्मयुगाची सुरूवात साधारण इ.स.पु १५ हजार वर्षापुर्वी पासुन ते धातुयुगाच्या सुरूवातीपर्यंत आहे. नवाश्मयुगाच्या सुरुवातीलाच मानवाला आगीचा व चाकाचा शोध लागला होता. मानवाच्या भटके जीवना कायमचे स्थिर करणारा महत्त्वाचा शोध म्हणजे मानवाला लागलेला **"शेतीचा शोध"** होय. या काळाता मानवाने तयार केलेली हत्यारे दोन्ही युगाच्या तुलनेत अतिशय तिक्ष्ण, धारचार व सुबक होती. यामध्ये शेतीसाठी उपयोगी पडणा-या अवजारांचा देखील समावेश होतो. आता तो संपुर्णपणे शिकार आणि फळे व कंदमुळे यांच्यावर अवलंबुन न राहता तो शेती करू लागला होता. शेतीसाठी पाण्याची गरज लक्षात घेऊन त्याने आपली वस्ती नदीकाठी वसवण्यास सुरूवात केली.


शेतीप्रमाणेच मानवाने या काळात शेतीसाठी व मांसासाठी उपयोगी पडतील असे पशु पाळायला सुरूवात केली. त्या मध्ये कुत्रा हा सर्व प्रथम माणसाळलेला व त्यानंतर गाय, बैल, शेळी, मेंढया यांसारख्या प्राण्यांचा समावेश होतो. शेतीप्रमाणे **"चाकाचा शोध"** हा मानवाच्या प्रगतीला गती देणारा शोध ठरला. चाकाचा उपयोग मानव प्रवासासाठी तर आडव्या चाकाचा वापर करून मानव त्यावर मातीची भांडी घडवु लागला. गुहांमध्ये राहणारा मानव आता झोपडया करून राहु लागला. मानवाच्या कुटूंबव्यवस्थेची सुरुवात हयाच काळापासुन झाली. थंडीपासुन संरक्षण करण्यासाठी तो झाडांच्या साली पासुन धागे काढुन वस्त्र तयार करू लागला.



## ❖ ताम्रपाषाणयुगीन संस्कृती-:

मानवाला धातु मध्ये सर्वप्रथम तांब्याचा शोध लागला. त्यामुळे तांबे व पाषाण यांचा एकत्रित वापर करणा-या संस्कृतीला "ताम्रपाषाण संस्कृती" म्हणतात. ताम्रपाषाणयुगीन वसाहती भारतात अनेक ठिकाणी आढळतात - राजस्थान मधील अहर गिलुंड व बालाथल तसेच पश्चिम मध्य प्रदेशात माळवा कायथा आणि एरण या ठिकाणी सापडतात. उत्तरप्रदेशात नरहन येथे व पश्चिम बंगाल येथे पंडू राजर ढिवी व महिषदल या ठिकाणी सापडतात. पश्चिम महाराष्ट्रात नेवासे, दायमाबाद, चांदोली, सोनगाव, इनामगाव इ. ठिकाणी आढळतात.

- महाराष्ट्रात जोर्वे व सावळदा संस्कृती, राजस्थानात गणेश्वर व जोधपुरा संस्कृती, मध्यप्रदेशात कायथा व माळवा संस्कृती आढळल्या आहेत.




**१. शेती :** ताम्रपाषाण युगातील लोक शेती करत असे. शेतीतून ते गहू, तांदूळ, बाजरी, मसूर, वाटाणे इ. अन्नधान्य पिकवत असे. पश्चिम महाराष्ट्रात हलकी जमीन असल्यामुळे रागी बाजरी व हलक्या वान्यांची लागवड ते करत असे. गाई मेंढ्या व हुकरे पाळत हरणाची शिकार करत. पश्चिम बंगाल मध्ये मासे पकडणाचे काटे मिळालेले आहेत यावरून ते मासे देखील खात असे हे दिसते.

**२. व्यवसाय:** शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी माळव्यात सापडलेल्या टकळया व चरखा यावरून तेथील लोकांना सुत कातणे व कापड तयार करण्याचे तंत्र अवगत होते हे समजते. तांब्यावर नक्षीकाम करणे, दगडावर काम करणारे कारागीर देखील तेथे होते.

३.**मृदभांडी :** ताम्रपाषाण युगातील लोक मातीची भांडी वापरीत असत. ही मातीची मांडी कुमार चाकावर तयार करत असत. उत्खननात मोठ्याप्रमाणात काळ्या व लाल रंगाच्या मातीची भांडी मिळाली आहे. मडकी ताटल्या वाटया या सारखी भांडी मिळाली आहेत. मध्यप्रदेश व राजस्थानमध्ये रंगवलेली व नक्षीकाम केलेली

भांडी सापडली आहेत. अन्न शिजविण्यासाठी खाण्यासाठी, पिण्यासाठी, साठवण करण्यासाठी या भांडयांचा वापर करीत.

**४. घरे:** ताम्रपाषाण कालखंडातील लोकांना भाजलेल्या विटांची परिचय झालेला नव्हता. त्यामुळे त्यांची घरे मातीच्या विटांची असत. काही घरे ताट्याची असत. त्यावर मातीने लिपून या घरावर छप्पर घालीत. अहर येथील उत्खननात घराच्या बांधणीसाठी तेथील लोकांनी दगडाचा वापर केला आहे. महाराष्ट्रातील दायमाबाद या गावाभोवती दगड व विटांच्या तुकडयांनी भिंत बांधली आहे. या भिंतीवर बुरुजही बांधलेले आढळले. इनामगाव येथे मातीची मोठी घरे आणि त्याच चुली आढळून आल्या.

**५. दफन:** महाराष्ट्रातील लोक मयत व्यक्तींना कलशात ठेवून आपल्या घराच्या जमिनीखाली उत्तर दक्षिण स्थितीत ठेवून पुरत असत. चांदोली व नेवासा येथील स्मशानभूमीत गळ्यात तांब्याचा आधार असलेल्या माळा घातलेली मुल पुरलेली आढळली. काही मुलांच्या जवळ मातीची भांडी पुरलेली आढळली. या काळात बालमृत्यूचे प्रमाण अधिक होते. पश्चिम महाराष्ट्रात लहान मुलांना पुरल्याचे अवशेष आढळून आले आहे. यावरून तत्कालीन कालखंडामध्ये आरोग्यविषयक अज्ञान असल्याचे दिसून येते

## ❖ ताम्रपाषायुगीन संस्कृतीचा ह्रास-:

हवामानात झालेला बदल हे ह्या संस्कृतीचा ह्रास होण्यामागचे महत्त्वपूर्ण कारण मानले जाते. तत्कालीन काळात मोठ्या प्रमाणात हवामानात शुष्कता निर्माण झाली. शुष्कतेमुळे शेती नष्ट झाली. त्यामुळे तेथील लोकांना पशुपालनाचा व्यवसाय करून भटके जीवन जगावे लागले.